**<u>प्रथम पक्षाचे साक्षीदार क. 2 यांचा सरतपास : प्रथम पक्षातर्फे श्री. आर. आर. पिटेकर वकील श्री. एस. व्ही. डंख वकील यांच्याकरिता यांच्यामार्फत शपथेवर सुरू :</u>**

1. मला आता दाखवण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर खरा आहे.

**<u>प्रथम पक्षाचे साक्षीदार क. 2 यांचा उलटतपास : द्वितीय पक्षातर्फे श्री. एन. एल. ढोबळे वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरू :</u>**

2. मी बजाज ऑटोमध्ये दि. 25/07/1989 रोजी Assistant Engineer, Industrial Engineering Department म्हणून रूजू झालो होतो. माझे काम म्हणजे Manpower Planning होते. 1989 मध्ये मी उत्पादनाच्या उदि्दष्टाप्रमाणे कामगारांचे नियोजन करत होतो. उत्पादनाच्या प्रमाणात कामगाराची भरती करत होतो, यावर मी असे म्हणतो की, आम्ही उत्पादकता व उदि्दष्ट या दोन्ही गोष्टी एकत्र करून काम करत होतो.

3. 1920 मध्ये किती उत्पादन होते यावर मी असे म्हणतो की, मी तक्ता दाखल केला आहे. 1989 मध्ये उत्पादन व उत्पादनाच्या उदि्दष्टासाठी किती कामगाराची आवश्यकता होती. हे आज मला सांगता येणे शक्य नाही. 1989 मधील उत्पादनाबदद्ल मला काहीच माहिती नाही, हे मला माहिती नाही.

4. मान्य आहे की, 1990 मध्ये किती उत्पादनासाठी किती कामगारांची आवश्यकता होती, हे मला आज सांगता येणे शक्य नाही.

5. 1990–1991 मध्ये आम्ही आमच्या तीनही कारखान्यातून सर्व प्रकारचे वाहन मिळून 8,60,399 वाहनांची विक्री केली होती. आमचे आकुर्डी, वाळूज व चाकण येथे कारखाने आहेत मान्य नाही की, मी प्रत्येक कारखान्याचे स्वतंत्र उत्पादन तक्ते दाखल केलेले नाही. साक्षीदार स्वतः असे सांगतात की, त्यांनी वाळूज कारखान्याची माहिती दिलेली आहे.

6. वाळूज कारखान्यात 1990–1991 दरम्यान 2,89,374 वाहनांचे उत्पादन झाले. त्यासाठी आम्हाला किती कायम कामगारांची व किती तात्पुरत्या कामगारांची आवश्यकता होती हे मी आज सांगू शकत नाही.

7. वाळूज कारखान्यात 1997–1998 दरम्यान 6,52,479 वाहनांचे उत्पादन झाले. त्यासाठी आम्हाला किती कायम कामगारांची व किती तात्पुरत्या कामगारांची आवश्यकता होती हे मी आज सांगू शकत नाही.

8. मान्य आहे की, 1990–1991 दरम्यान ज्या पध्दतीने उत्पादन वाढले आहे, त्याच प्रमाणात आतापर्यंत आमचे उत्पादन वाढत गेले आहे. साक्षीदार स्वतः असे सांगतात की, प्रमाणात उत्पादन वाढलेले नाही परंतु, उत्पादन वाढलेले आहे. साक्षीदार पुन्हा सांगतात की, उत्पादनात चढ–उतार झालेले आहे. नेमके कोणत्या महिन्यात उत्पादन कमी होते, हे सांगण्यासाठी मला सर्व तपशील पहावा लागेल.

9. कोणत्या महिन्यामध्ये उत्पादनासाठी किती तात्पुरत्या कामगारांची आवश्यकता होती, हे आज मला सांगता येणे शक्य नाही.

10. मान्य नाही की, 1990–1991 ते 1997–1998 दरम्यान प्रत्येक महिन्यात आम्ही कामगारांची भरती करत आलो आहे. ठराविक उत्पादनासाठी ठराविक कामगार लागतात हे मी न्यायालयासमक्ष सांगितलेले नाही, यावर मी असे म्हणतो की ते मी सांगू शकत नाही. मान्य आहे की, आम्ही न्यायालयासमक्ष Organization Chart दाखल केलेला नाही.

Manpower Calculation Formula खालीलप्रमाणे आहे :

Target X Revised Norman Time per Vehicle
---------------------------------------------------------- = Manpower
Available Man Minutes

या सूत्राप्रमाणे 1990 मध्ये किती कामगारांची आवश्यकता होती, हे मला आज सांगता येणे शक्य नाही. मान्य नाह ीकी, मी सांगितलेले सुत्र पुर्णतः चुकीचे आहे.

11. मान्य नाही की, मी नेमक्या कोणत्या वर्षातील कोणत्या महिन्यात उत्पादन कमी झाले आहे, हे नमूद केलेले नाही.

12. प्रस्तुतच्या प्रकरणातील द्वितीय पक्षकार यांना ज्या ज्या वेळेस आम्ही नियुक्त केले होते, त्या वेळैस उत्पादन वाढते होते काय, हे मला सांगता येणे शक्य नाही.

13. मान्य आहे की, त्यानंतर उत्पादन कमी झाल्यामुळे आम्ही सदर कामगाराला कामावरून कमी केले होते. साक्षीदार स्वतः असे सांगतात की, उत्पादनाची तेवढी आवश्यकता नव्हती व उत्पादकता वाढली होती.

14. या कामगाराला कामावरून कमी केल्यानंतर आम्ही इतर कामगारांची भरती केली होती, या वर मी असे म्हणतो, मी प्लॅनर असल्यामुळे, याबद्दल मी काही सांगू शकत नाही.

15. एकूण उत्पादनात 1990–1991 ते 1997–1998 दरम्यान भारतातील विक्री व निर्यात यातील विक्रीची टककेवारी किती होती, हे आता मला सांगता येणे शक्य नाही.

16. मी जे उत्पादनातील चढ–उतार नमूद केले आहे, ते भारतातील विक्री व निर्यात दोन्हीसाठी लागू आहे. निर्यातमधील चढ–उतार सुध्दा मी नमूद केले नाही, यावर मी असे म्हणतो की, मी सांगू शकत नाही.

17. मान्य आहे की, आम्ही औरंगाबाद येथील कारखान्यातून देशांतर्गत विक्रीसाठी व निर्यातीसाठी अशा दोन्ही प्रकारच्या वाहनांचे उत्पादन करतो.

18. 1990–1991 ते 1997–1998 दरम्यान आमचे एकूण उलाढाल तसेच नफा हया दोन्ही गोष्टी वाढल्या, यावर मी भाष्य करू शकत नाही.

19. मान्य नाही की, 1990–1991 ते 2012–2013 दरम्यान आमचे उत्पादन जवळपास 6 पटीने वाढले आहे. साक्षीदार स्वतः असे सांगतात की, त्याचबरोबर विविध प्रकारच्या सुधारणांमुळे उत्पादकता वाढली व त्यामुळे टारगेट वाढून देखील मनुष्यबळ संख्या त्याप्रमाणे वाढली नाही.

20. मान्य नाही की, 1998–1999 कारखान्यातील बरेचसे प्रोसेस कारखान्याच्या बाहेर वर्ग केले होते.

21. मान्य आहे की, मी औरंगाबाद कारखान्यासाठी नियोजन करत होतो. मान्य नाही की, माझे नियोजनाच्या आधारेच व्यवस्थापन कामगारांच्या भरतीबद्दल व कमी करण्याबद्दल निर्णय घेत असे.

22. मान्य नाही की, माझे नियोजनात 7 महिन्यांचीच नियुक्ती दयावी असे होते. कामगारांना 7 महिन्यांची नियुक्ती कशाच्या आधारे देण्यात आली, यावर मी असे म्हणतो की, नियुक्तीचे काम माझेकडे नव्हते.

23. ब–याचशा कर्मचा–यांनी औद्योगिक न्यायालयात सुध्दा प्रकरण दाखल केले होते, याबदद्ल मला माहिती नाही. मला माहिती नाही की, त्या कर्मचा–यांना मा. सर्वोच्च न्यायालयाने नुकसान भरपाई दिली आहे.

24. मान्य नाही, मला काही माहिती नसतांना मी न्यायालयासमक्ष चुकीची साक्ष देत आहे.

उलटतपास : संपुर्ण.

फेरतपास : काही नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by DATTATRAY SHANKARRAO KHEDEKAR
Date: 2026.02.11 11:16:04 +0530

**(द.शं.खेडेकर)**
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. 1 औरंगाबाद

दिनांक–10/02/2026